# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ५६ व ५९/२००६/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. सोमलिंग भिमाण्णा माळी,<br>मु.पो. पांढरेवाडी, ता.जत, जि. सांगली<br>२) श्री. अशोक दादू कसबे,<br>मु.पो. मल्याळ, ता.जत, जि. सांगली<br>तर्फे श्री. एच.डी. खापरे, प्रतिनिधी,<br>रा.जत, जिल्हा–सांगली. | तक्रारदार |
| **<u>विरूध्द</u>** | |
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली.<br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु ग्रामीण विभागीय कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभागीय कार्यालय, जत, जि. सांगली.<br>४) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभाग, संख, ता.जत, जि. सांगली. | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :- १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) एम.बी. भाजीभाकरे, सदस्य–सचिव

महाराष्ट्र वीज नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

सर्वश्री सोमलिंग माळी , रा. पांढरेवाडी व अशोक कसबे, रा.मल्याळ, ता.जत,जि.सांगली, यांनी प्रस्तुतचे अपील विहीत "अ" नमुन्यात दि. २१/९/२००६ रोजी या ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे सादर केले आहे तत्पूर्वी तक्रारदार यांनी अनुक्रमे दि. २६/६/२००६ व २१/६/२००६ रोजी मंडल पातळीवरील अंतर्गत तक्रार निवारण कक्षामध्ये तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने ६० दिवसाचे कालावधीत सुनावणी ठेवली नाही. तसेच सदर तक्रारीबाबत कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे विहीत मुदतीनंतर तक्रारदारांनी प्रस्तुतचे अपील मंचाकडे केले आहे.

२) अर्जदारांची तक्रार थोडक्यांत खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते –

अर्जदार यांनी आपल्या शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी अनुक्रमे दि. २१/१/२००० व दि. २९/१/२००४ रोजी अर्ज केले असून वीज मंडळाचे नियमानुसार डिपॉझीट रक्कमही वितरण परवानेधारकाकडे भरणा केली आहे. तथापि अर्जदारांचे शेती पंपास अद्यापही वीज पुरवठा करण्यांत आला नाही. सबब महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडील केस नं ४३/२००६ दि १/६/२००६ चे आदेशानुसार तसेच विद्युत अधिनियम २००३ चे कलम ४३ मधील तरतूदीनुसार अर्जदार यांच्या शेती पंपास वीज पुरवठा करण्यांत यावा. त्याचप्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाने धारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरुवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण ) विनियम २००५ मधील तरतूदीनुसार विहीत मुदतीत वितरण परवानेधारकास अर्जदार यांच्या शेती पंपास वीज पुरवठा करण्यांत अपयश आल्याने सदरचे विनियम शासकीय राजपत्रांत प्रसिध्द झाल्यापासून म्हणजे २० जानेवारी, २००५ पासून प्रत्यक्ष वीज पुरवठा करण्यांत येईल त्या तारखेपर्यंत त्यांना देय असलेली नुकसान भरपाई मिळावी.

३) प्रकरणी सुनावणीची तारीख १७/१०/२००६ रोजी नेमण्यांत आली होती त्यावेळी तक्रारदारांचेवतीने प्रतिनिधी श्री. खापरे यांनी तोंडी तसेच लेखी म्हणणे मांडले. त्यांनी तक्रारदारांचे वतीने असे सांगितले की अर्जदार श्री. सोमलिंग माळी, रा. पांढरेवाडी. ता.जत याने सुमाने ७ वर्षापूर्वी शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी अर्ज केला होता. तसेच वीज मंडळाचे नियमानुसार डिपॉझीट रक्कमही वि.प. कडे भरणा केली होती. तथापि त्यांना वि.प. यांनी अद्यापपर्यंत वीज पुरवठा केलेला नाही. त्यामुळे त्यांना बागायतीसाठी पाण्याचा भरपूर साठा उपलब्ध असताना स्वत:चे गांव सोडून परगांवी मोलमजूरी करणे भाग पडत आहे. त्यांच्या शेती पंपास मार्च,२००७ पर्यंत वीज पुरवठा केल्यास एका कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होऊन त्यांची सध्याची आर्थिक दुर्बलता दूर होईल. दुसरे तक्रारदार श्री. अशोक कसबे यांचा वीज पुरवठा मागणीचा अर्ज सन २००४ चा असल्याने त्यांचेबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

वि.प. यांनीही आपली बाजू तोंडी तसेच लेखी सादर केली. अर्जदार यांनी कक्षामध्ये दाखल केलेल्या तक्रारीचे कामी अनावधानाने विहित मुदतीत आदेश पारीत करण्याचे राहून गेल्याचे वि.प. यांच्या वतीने सांगण्यात आले. मात्र ही बाब कक्षाचे लक्षांत आल्यानंतर वि.प. यांनी प्रकरणी दि. ९/१०/२००६ रोजी सुनावणी ठेवून दि १३/१०/२००६ रोजी आदेश पारीत केल्याचे सांगितले. त्या आदेशाची प्रत मंचास दि. १६/१०/२००६

रोजी प्राप्त झाली आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की अर्जदार यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरुवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे कलम ३.३.३ नुसार अंदाजपत्रकातील सर्व रक्कम भरणा केलेली नाही त्यामुळे त्यांना कृती मानकाप्रमाणे वीज पुरवठा करण्यांत आलेला नाही. ही वस्तुस्थिती विचारांत घेता अर्जदार यांना विलंबाबद्दल नुकसान भरपाई देण्याचे कारण नाही. वि.प. यांनी दि. १७/१०/२००६ रोजी सुनावणीचेवेळी लेखी म्हणणे सादर केले आहे त्यामध्येही त्यांनी आदेशांत नमूद केल्याप्रमाणे अर्जदार यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरुवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे कलम ३.३ नुसार अंदाजपत्रकतील सर्व रक्कम वीज कंपनीकडे भरल्यास किंवा वाहिनीचे काम स्वत: मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून करून मजुरीच्या १५ टक्के देखरेख खर्च कंपनीकडे भरणा केल्यास त्यांना कृती मानकानुसार वि.प. वीज पुरवठा करू शकेल. वि.प. यांनी आपल्या निवेदनांमध्ये असेही नमूद केले आहे की शेती पंपास वीज पुरवठा करण्याकामी मा.विद्युत लोकपाल मुंबई यांनी दि. २२/८/२००६ रोजी (अपील क्र. ४९/२००६) दिलेला निकाल विचारांत घेऊन प्रस्तुतचे प्रकरणी वि.प. चे बाजूने आदेश व्हावेत.

तक्रारदारांचे प्रतिनिधी श्री. खापरे तसेच वि.प. यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेले तोंडी म्हणणे, लेखी निवेदन तसेच प्रकरणी उपलब्ध असलेला पुरावा विचारांत घेता असे दिसून येते की श्री. सोमलिंग माळी, रा.पांढरेवाडी, ता.जत यांनी सुमारे ७ वर्षापूर्वी आपल्या शेतीपंपास वीज पुरवठा करण्याची मागणी वि.प. यांचेकडे केली होती. त्याकामी आवश्यक असलेली डिपॉझीटची रक्कमही वि.प. यांचेकडे भरणा केली होती. तथापि त्यांच्या शेती पंपास वीज पुरवठा करण्यांत आला नाही. त्यामुळे अर्जदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली मंडल सांगली यांचेकडे विहित नमुन्यांत तक्रार नोंदविली. त्याकामी कक्षाने सुनावणीची तारीख नेमली नाही तसेच ६० दिवसांचे मुदतीत कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे तक्रारदार यांना परिमंडल पातळीवरील ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे अपील करणे भाग पडले आहे. त्या दरम्यान कक्षाचे असे लक्षांत आले की अर्जदाराने रजिस्टर केलेल्या तक्रारीकामी नजर चुकीने / अनावधानाने सुनावणीची तारीख नेमण्यात आलेली नाही. तसेच त्याकामी कक्षाने आदेश पारीत करण्याचे राहून गेले आहे म्हणून कक्षाने दि. ९/१०/२००६ रोजी सुनावणी ठेवून प्रकरणी दि. १३/१०/२००६ रोजी आदेश पारीत केले आहेत. सरदचे आदेश मंचास दि. १६/१०/२००६ रोजी प्राप्त झाले आहेत. त्या आदेशामध्ये असे नमूद केले आहे की अर्जदार यांना तातडीने वीज कनेक्शन पाहिजे असल्यास त्यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे कलम ३.३.३ नुसार सर्व रक्कम वितरण कंपनीकडे भरणा करावी किंवा अंदाजपत्रकतील मंजूर रक्कमेच्या १५ टक्के देखरेख खर्च कंपनीकडे भरून स्वत:च्या खर्चाने मान्यताप्राप्त कंत्राटदारांकडून काम करून घ्यावे. तसे केल्यास वि.प. यांना एम.ई.आर.सी. च्या कृती मानकानुसार अर्जदारास तातडीने वीज पुरवठा करणे शक्य आहे. सदरचे वि.प. यांचे म्हणणे तर्कसंगत वाटत नाही कारण अर्जदार श्री. माळी यांनी दि. २१/१/२००० रोजी शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी वि.प. यांचेकडे मागणी केल्यापासून कक्षाने आदेश पारीत केल्याचे तारखेपर्यंत म्हणजे १३/१०/२००६ पर्यंत त्यांना याबाबत कांहीही कळविलेले नाही. तक्रारदाराने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विनियम २००५ चे तरतूदीनुसार मंडल पातळीवरील अंतर्गत तक्रार निवारण कक्षांमध्ये दाद मागितल्यानंतर त्याला वर नमूद केल्याप्रमाणे कळविले आहे. अर्जदार श्री. माळी यांचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी सुनावणीचेवेळी कथन केलेली वस्तुस्थिती खरी असल्याचे ग्राह्य धरल्यास अर्जदार यांचेकडे पुरेशी पाण्याची उपलब्धता असतांनाही त्यांच्या शेती पंपास वीज पुरवठा न केल्यामुळे त्यांना स्वत:ची शेती बागायत करतां आली

नाही त्यामुळे कुटुंबाचे चरितार्थासाठी स्वत:चे गांव सोडून परगांवी जाऊन मोलमजूरी करावी लागते हे विदारक चित्र आहे. तसेच या ग्राहकास सुमारे ६–७ वर्षाचे कालावधीनंतर कलम ३.३.३ ची पूर्तता करण्यास सांगणे अयोग्य व अन्यायाचे वाटते. सबब श्री. माळी व श्री. कसबे यांचे कामी वि.प. यांनी प्रत्यक्ष पहाणी करून अर्जदार यांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्यापासून ३ महिन्याचे आंत त्यांच्या शेती पंपास वीज पुरवठा करणे योग्य होईल असे मंचाचे अध्यक्ष तसेच सदस्य यांचे मत आहे.

**<u>तथापि ग्राहक गा–हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूरचे सदस्य–सचिव यांना अध्यक्ष तसेच सदस्य यांचे मत मान्य नाही. प्रकरणी त्यांचे मत खालील प्रमाणे असून त्याची सर्वार्थाने नोंद घ्यावीअसा त्यांचा आग्रह आहे:–</u>**

शेती पंपाचे उर्जीकरणाकरिता वितरण कंपनीस ग्रामीण विद्युतिकरण महामंडळाकडून निधी मंजूर करून घ्यावा लागतो व सदर निधी व तीही कर्जाऊ रक्कम शासनाची हमी मिळाल्यानंतर हप्त्या–हप्त्याने वितरण कंपनीस प्राप्त होते, त्यामुळे शेती पंपाचे उर्जिकरण शासनाच्या निधी उपलब्धतेवर अवलंबून आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ च्या कलम ४.४ नुसार विद्युत परवानेधारक जेथवर शक्य असेल तेथवर वीज दराच्या वर्गवारीतील "प्रथम येणा–यास प्रथम प्राधान्य " या तत्वावर वीज पुरवठा करील.

एखाद्या ग्राहकास तातडीने कनेक्शन हवे असल्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ च्या कलम ३.३ मधील उपकलम ३.३.२ व ३.३.४ अन्वये विद्युत वाहिनी उभारणीसाठी येणारा सर्व खर्च भरण्यास तयार असेल अथवा परवानेधारक विद्युत ठेकेदाराकडून वाहिनी उभारणीचे काम करून घेऊन विद्युत परवानेधारकाकडे १.३ टक्के देखभाल रक्कम भरण्यास तयार असेल तर त्यांना तातडीने विद्युत पुरवठा करू शकेल. सदर ग्राहकांची विलंबाबातची दंड करणेची मागणी या ठिकाणी लागू होत नसल्यामुळे ती स्वीकारता येत नाही.

मंचाचे अध्यक्ष व सदस्य यांचे म्हणण्यानुसार श्री सोमलिंग माळी यांचे शेती पंपाचे कनेक्शन "त्यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यापासून तीन महिन्यात " वीज कनेक्शन द्यावयाचे म्हंटल्यास महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, विनियम २००५ चे कलम ४.४ प्रमाणे प्रथम येणा–यास प्रथम प्राधान्य या तत्वावर आधारित प्रतिक्षा यादीतील इतर अर्जदारांना डावलून वरील तक्रारदारांना विद्युत पुरवठा करावा लागेल त्यामुळे प्रतिक्षा यादीतील इतर अर्जदारावर अन्याय केल्यासारखे होईल तेंव्हा मा.विद्युत लोकपाल यांचेकडील अपील नं. ४९/२००६ दि. २२/८/२००६ च्या आदेशाप्रमाणे कार्यवाही व्हावी अथवा मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, मुंबई यांनी दि. १ जून, २००६ रोजी दिलेल्या निकाला विरूध्द ट्रायब्युनल कोर्ट, दिल्ली यांचेकडे दाखल केलेल्या अपिलाचे कामी होणा–या आदेशानुसार वीज पुरवठा करावा असे सदस्य–सचिव यांचे मत आहे.

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल, सांगली यांनी सदर प्रकरणी दिनांक १३/१०/२००६ रोजी दिलेला आदेश योग्य आहे असे या मंचाचे सदस्य–सचिव यांचे मत आहे.

तक्रारदार व वि.प. यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेले तोंडी म्हणणे / लेखी निवेदन, पुराव्याचे कागदपत्र, प्रकरणांतील वस्तुस्थिती तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केलेल्या विनियमांतील तरतूदीचा विचार करून मंच बहुमताने खालील प्रमाणे आदेश देत आहे.

# आदेश

१. अर्जदार श्री. सोमलिंग माळी यांनी दि. २१/१/२००० रोजी शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी केलेल्या अर्जाचे कामी त्यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यापासून ३ महिन्यांत वीज कनेक्शन देण्यांत यावे. श्री. अशोक कसबे यांचा दि. २९/१/२००४ चा अर्ज अपूर्ण असल्याचे विचारांत घेता त्यांच्या शेती पंपास ज्येष्ठता यादीप्रमाणे वीज पुरवठा करण्यांत यावा.

२. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी केल्याचे विनियम २००६ चे कलम ८.३ चे तरतूदीनुसार मंचास दि. ३१/३/२००७ पर्यंत कळवावे.

३. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल “केशवा” बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल. तसेच वि.प. यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना मा.ना. उच्च न्यायालय, मुंबई, अथवा दिवाणी न्यायालयात करता येईल.

| | | |
|---|---|---|
| (एम.बी.भाजीभाकरे) | (जी. सी. लेले) | (के. व्ही. पाटील) |
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |